दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● सोमवार दि.८ सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक २३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Monday 8 Sep 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 23 ● Pages 4 ● Rate 4 Rs

प्रतिनिधी नेमणे आहे
लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.

## देवेंद्र फडणवीस हे हिमालयासारखे नेते

# राजकारणासाठी त्यांनी कधी समाजाचा वापर नाही केला-मंत्री शिवेंद्रराजे भोसले



**पुणे (वृत्तसंस्था)**–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे वंचितांचे ओबीसींचे नेते नाही तर मराठ्यांचे पण नेते आहेत. त्यांनी ओबीसी विरोधी भूमिका घेतली नाही. कोणाच्याही आरक्षणाला धक्का न लावता त्यांनी आरक्षण दिले आहे, असे मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी म्हटले आहे. तसेच देवेंद्र फडणवीस हे हिमालयासारखे नेते आहेत, राजकारणासाठी त्यांनी समाजाचा वापर केला नाही, त्यामुळे आरक्षणासाठी कोण बोलत असेल त्याकडे दुर्लक्ष करा, असे भोसले यांनी म्हटले आहे. क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त सोहळ्यात बोलताना शिवेंद्रराजे भोसले यांनी देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले.

शिवेंद्रराजे भोसले म्हणाले, राजे उमाजी नाईक यांची शासकीय जयंती व्हावी अशी मागणी होत होती. समाजाला दाबून ठेवण्याचे काम केले गेलं. समजून घेणारा नेता आला आणि जयंती आता साजरी होत आहे. देशात ज्यांनी अनेक वर्ष राज्य चालवले त्यांना जे जमले नाही ते मोदी यांनी केले. दिल्लीत शिवाजी महाराज आणि बाबासाहेब आंबेडकर आणि यशवंतराव चव्हाण यांचे पुतळे मोदी पंतप्रधान झाल्यावर बांधले गेले. उमाजी नाईक यांची जयंती देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केली. ओबीसी मुलांचा विकास देशात नरेंद्र आणि राज्यात देवेंद्र आहे म्हणून झाला आहे. त्यांनी सांगितले की, फडणवीस यांना प्रश्नांची जाण आहे म्हणून थोपटे यांच्या कारखान्यांना ४२० कोटी रुपये कर्ज दिले. पुढे बोलताना शिवेंद्रराजे भोसले म्हणाले, राजकीय पोळी भाजण्याचे काम करणाऱ्या लोकांनी ओबीसी आणि मराठा लोकांचा वापर केला. यात काँग्रेस, राष्ट्रवादी आणि इतर पक्षांनी हे काम केले. मला मंत्री केले. आता माझ्या विभागाच्या वतीने इथे काम करता आले. त्याबद्दल बरे वाटले. स्मारक लवकरच होईल. रामोशी समाज आणि छत्रपती यांचे काही तरी काम करण्याची संधी मिळाली. आपण आपल्या माणसाला मोठे केले पाहिजे, असे भोसले म्हणाले.दरम्यान, मनोज जरांगे यांच्या मागण्या मान्य करताना त्याबद्दलचा मसुदा घेऊन जाताना शिवेंद्रराजे भोसले देखील उपस्थित होते. राधाकृष्ण विखे पाटील हे मराठा समाज उपसमितीचे अध्यक्ष असून त्यांच्यासोबत मंत्री माणिकराव कोकाटे तसेच उदय सामंत देखील उपस्थित होते.



# घरकुल चे नवीन हप्ते १ ला,व २ रा,३ रा तात्काळ वाटप करा शिष्टमंडळाची मागणी

## १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती दिना दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे निदर्शन

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर नगरपालिका परिसरातील पहिला दुसरा तिसरा थकीत हत्या साठी शिष्टमंडळांनी घेतली शेवटची भेट दि. ४ सप्टेंबर २०२५ रोजी शिष्टमंडळाने पुन्हा एकदा न.प.मुख्याधिकारी शैलेश फडसे यांची समक्ष भेट घेऊन रमाई घरकुल आवास योजनेचे थकित आणि नवीन हप्ते पहिला दुसरा आणि तिसऱ्याची तात्काळ वाटप करावी अशी मागणी करण्यात आली आहे. रमाई घरकुल योजनेचा पहिला दुसरा आणि तिसरा हप्ता तात्काळ न दिल्यास १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती दिना दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे निदर्शने करण्यात येतील असा इशारा शिष्टमंडळाने न.प. मुख्याधिकारी शैलेश पडसे यांना देण्यात आला. सदरिल



शिष्टमंडळात सर्व चळवळीतील प्रमुख कार्यकर्ते आणि माजी नगरसेवक उपस्थित होते त्यात बबन वडमारे,गणेश वाघमारे, अँड.राहुल मस्के अशोक वीर,भीमराव वाघचौरे, विकास, जोगदंड अमोलजी पोळ,विनोद सवाई, स्वप्निल हातागळे इत्यादी यावेळी भारत सोननर पण उपस्थित होते. न.प.मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी शिष्टमंडळास रमाई घरकुल योजनेचे हप्ते तात्काळ वाटप करण्याचे आश्वासन दिले आहे.

## मुंडेवाडी गावचे ग्रामस्थ एकवटले!

# ग्रामस्थांनी दारूच्या बाटल्या फोडून केला निषेध व्यक्त

**केज । प्रतिनिधी**



केज तालुक्यातील मुंडेवाडी गावामध्ये अवैद्य देशी दारू विक्री मुळे गावातील अनेक लोकांचा जीव गेला आहे,हा अतिशय गंभीर गुन्हा असून यातील मुख्य आरोपी नवनाथ गहिनीनाथ घोळवे याच्यावर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांनी भगवान बाबा चौकात दारूच्या बाटल्या फोडून केली आहे.या बाबत सविस्तर वृत्त असे की,अंबाजोगाई गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलिस उपनिरीक्षक श्री. जगदीश कोरे यांच्या पथकाने मुंडेवाडी ता. केज जि.बीड येथील भगवान बाबा चौकात अवैधरित्या दारू विक्री करणारा नवनाथ गहिनीनाथ घोळवे याच्या दुकानावर धाड टाकून धंद्याच्या ठिकाणावर मुद्देमाला सह दारू पकडून व पंचनामा करून त्यांच्या दप्तरी गुन्हा नोंद केला आहे.परंतु नवनाथ घोळवे यांने त्याच दिवशी दुपार नंतर आजतागायत सतत पुन्हा दारू विक्री करत आहे व ते लोकांना सांगत आहे की माझे पोलीस अधिकारी किंवा कोणीही काही वाकडे करू शकत नाही मी त्यांना त्यांच्या घरी हफ्ते पोहोच करीत आहे.गावामध्ये सदर च्या दारू विक्रीमुळे दारू पिऊन पाच पुरुष मृत्यू पावले आहेत. एकवीस वर्षाच्या आतल्या पाच महिला विधवा झाल्या आहेत. अनेकांचे संसार देशो धडीला लागले आहेत. यापुढेही गावात दारू विक्री चालू राहिली तर तरुण मुले,पुरुष दारूच्या आहारीजाऊन व्यसनाधीन बनतील व मरतील अशी भीतीदायक परिस्थिती गावांमध्ये निर्माण झाली आहे.ग्रामपंचायत सरपंच,उपसरपंच, सदस्य ज्येष्ठ नागरिक महिला तरुण मंडळ यांनी एकत्रित येऊन नवनाथ गहिनीनाथ घोळवे हा गावात अवैध रित्या देशी दारू विक्री करत आहे.त्यांच्यावर कठोरात कठोरकारवाई करून गावातील दारू विक्री बंद करावी असा ग्रामपंचायतीचा ठराव घेऊन ग्रामस्थांनी निषेध नोंदवला आहे

# गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या.. घोषणांचा जयघोष!

## कृषिकुलच्या बाप्पांना भक्तिभावात भावपूर्ण निरोप

**सिरसाळा । परळी वैजनाथ**

जलनायक मयंक गांधी यांनी स्थापित केलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शेतकरी प्रशिक्षण केंद्र असलेल्या कृषिकुल येथे यंदाचा गणेशोत्सव भक्तिभावात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. गणरायाच्या मूर्तींचे विधिवत विसर्जन करताना संपूर्ण परिसर गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या! आदि घोषणांच्या गजराने दुमदुमून गेला.विसर्जनाच्या दिवशी कृषिकुलच्या सर्व कर्मचाऱ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती. ढोल, ताशा, हालगीच्या तालावर लेझीमच्या पारंपरिक निनादात श्रीगणेशाची भव्य मिरवणूक काढण्यात आली. गणपती चालले गावाला चैन पडेना जिवाला अशा भावस्पर्शी घोषणा देत भक्तांनी आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप दिला. गणेशोत्सवाच्या काळात दररोज श्रींची आरती विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते करण्यात येत होती. संपूर्ण कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला. कृषीकुल येथे स्थापित बाप्पाची विसर्जन मिरवणूक खास आकर्षण ठरली. या भक्तीभावपूर्ण प्रसंगात कृषिकुलचा संघभाव, श्रद्धा आणि पारंपरिक सांस्कृतिक वारसा यांचे सुंदर दर्शन घडले.



**बीड – छत्रपती संभाजीनगर येथील गॅलेक्सी हॉस्पिटल येथे संघर्ष योद्धा माननीय मनोज दादा जरांगे पाटील यांची शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी भेट घेऊन त्यांच्या तब्येतीची आस्थेवाईकपणे विचारपूस केली.व मराठा आरक्षणाच्या या लढ्यामध्ये महाराष्ट्रासह बीड जिल्ह्यातील जीव गमावलेल्या मराठा बांधवांच्या वारसांना मदत मिळवून दिली याबद्दल त्यांचे आभार मानले.**





## संपादकीय

# वरुणराजाचे तांडव



महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यांमध्ये पावसाचे तांडव सुरू असून अनेक तालुक्यांमध्ये पूरसदृश चिंतेचे वातावरण आहे. महाराष्ट्रापुरते बोलावयाचे झाल्यास मुंबई शहर, उपनगर, ठाणे, पालघर, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, पनवेल, उरण, वसई-विरार आदी भागांमध्ये अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले आहे. दरवर्षी होणाऱ्या पावसाचा कोकण भागातील धुमाकूळ ही नित्याचीच बाब झाली आहे. दरवर्षीच्या पावसाळा कालावधीतील अतिवृष्टी एव्हाना कोकणी माणसाच्याही अंगवळणी पडलेली आहे. गणेशोत्सवामध्ये दरवर्षी हमखास पाऊस असतोच. यंदाही पावसाने आपल्या उपस्थितीचे अस्तित्व दाखवून दिले आहे. जून ते सप्टेंबर असा पावसाचा हंगाम असला तरी यंदा पावसाने मे महिन्यापासूनच सुरुवात केलेली आहे. मे महिन्यात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावत महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात अनेक ठिकाणी जून-जुलै महिन्यांत दडी मारली होती. अवकाळी पावसामुळे शेतातील पिकांनाही ऐन कडाक्याच्या उन्हाळ्यात संजीवनी प्राप्त झाली होती; परंतु ऑगस्ट महिन्यात ग्रामीण भागात झालेल्या अतिवृष्टीने जून-जुलै महिन्यांचा बॅकलॉग भरून काढला होता. पंजाब, जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये पाऊस थैमान घालत आहे. या राज्यांमध्ये अनेक ठिकाणी पूर आणि भूस्खलनाच्या घटना घडल्या आहेत. यामुळे आतापर्यंत अनेकांना प्राण गमवावे लागले असून, हजारो लोकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित केले. पंजाबमधील आठ जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसानंतर १०१८ गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. पूर आणि पावसामुळे राज्यात आतापर्यंत ८ जणांचा मृत्यू झाला असून ३ जण बेपत्ता आहेत. प्रशासनाने तातडीने बचावकार्य हाती घेत ११ हजारांहून अधिक लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवले. रावी नदीची पाण्याची पातळी वाढल्याने गुरुदासपूर जिल्ह्यातील घोणेवाले येथील धुस्सी बंधारा फुटला. देशाच्या उत्तर आणि वायव्य भागाबरोबरच मध्य भागातही बुधवारी मुसळधार पाऊस झाला. पूरग्रस्त पंजाब आणि हरियाणामध्ये गेल्या काही आठवड्यांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मोठा भूभाग पाण्याखाली गेला असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. पंजाबमधील अमृतसर, लुधियाना, पतियाळा, पठाणकोट, गुरसादपूर आणि मोहाली या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस झाला, तर हरियाणाच्या अंबालामध्ये या कालावधीत १०५.६ मिमी इतका पाऊस झाला. दोन्ही राज्यांची राजधानी असलेल्या चंडिगडमध्ये ६३.६ मिमी पाऊस झाला. हरियाणातील घग्गर, मार्कंडा आणि टांगरी या नद्यांच्या पाण्याची पातळी वाढत आहे. पंजाबच्या सतलज, बियास आणि रावी या नद्यांसह हंगामी उपनद्यांची पातळी वाढल्यामुळे त्या राज्यात मोठ्या प्रमाणात पूर आला आहे. पंजाबमध्ये एनडीआरएफ, लष्कर, बीएसएफ, पोलीस आणि जिल्हानिहाय प्रशासन यांच्यामार्फत पूरग्रस्त भागांमध्ये मदत व बचावकार्य सुरू आहे. छत्तीसगडच्या बलरामपूर जिल्ह्यात अचानक आलेल्या पुरामुळे चार जणांचा मृत्यू झाला आणि अन्य तिघे जखमी झाले अशी माहिती अधिकाऱ्यांनी बुधवारी दिली. पंजाब, जम्मू-काश्मीर, उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेश या पूरग्रस्त प्रदेशांसाठी तातडीने विशेष मदतीचे पॅकेज जाहीर करावे, अशी विनंती विरोधी पक्षांकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे करण्यात आली आहे. लहरी हवामानामुळे उन्हाळ्यात पाऊस असतो, तर पावसाळ्यात उकाडा जाणवतो आणि थंडीच्या काळात पाऊस, कडाक्याचे ऊन या दोन्हींचा मिलाफ पाहावयास मिळतो. हवामानातील बदल जरी विनाशास हातभार लावत असला तरी प्रशासनाला या घडामोडीतील हानी रोखण्यासाठी आलेल्या अपयशाचे खापर हे निश्चितच प्रशासनावर फोडले पाहिजे. भूतलावरील वृक्षसंपदेचे घटते प्रमाण ही प्रामुख्याने मुख्य बाब मानली जात आहे. वृक्षसंपदा कमी झाल्याने भूसंखलनाचे प्रमाण वाढले आहे. वृक्षांची जमिनीमध्ये खोलवर गेलेली मुळे ही जमीन पकडून ठेवण्यास महत्त्वाची भूमिका बजावत असते. तसेच थोडा जरी पाऊस पडला तरी आपणाकडे नदी-नाले तुडुंब भरले. धरणे-तलाव ओव्हर फ्लो झाले, असे वाचावयास मिळते; परंतु वास्तविकता काही वेगळीच असते. नदी, नाल्यामध्ये सभोवतालची माती-गाळ वाहत येत असतो. अनेक वर्षे आपल्या नद्या, तलाव, धरणातील गाळ काढण्यात न आल्याने तलाव व समुद्राची खोली कमी होत चालली असून याचा साठा क्षेत्रावरही प्रतिकूल परिणाम झालेला आहे. याचे उत्तम उदाहरण आपणास हार्बर रेल्वे मार्गावरील वाशी खाडीपुलावर दिसून येते. १९९०च्या सुमारास वाशी खाडीपुलावरून मुंबई आणि नवी मुंबई दरम्यान रेल्वे सुविधा उपलब्ध झाली. आज जवळपास ३५ वर्षे या घटनेला लोटली आहेत. या साडेतीन दशकांमध्ये वाशी खाडीमध्ये सभोवतालच्या भागातील कचरा, माती नाल्यांच्या माध्यमातून विसावला आहे. या खाडीतील गाळ, माती प्रशासनाकडून आजतागायत काढण्यात आलेली नाही. त्यामुळे वाशी खाडीपुलावरील रेल्वे आणि खाडीतील पाणी यामध्ये एकेकाळी खूप अंतर होते, पण आता ते अंतर मोठ्या प्रमाणावर कमी झाले असून पावसाळ्यात वरून कोसळणारा पाऊस आणि खाडीच्या लाटा व त्यातून धावणारी रेल्वे पाहिल्यावर खाडीतील पाणी काही अंतरावर येऊन ठेपल्याचे स्पष्टपणे दिसून येते. बद्रीनाथ, केदारनाथ यांसह अन्य धार्मिक स्थळांवर पावसाळ्यात अडथळे येत असल्याने या यात्रा दरवर्षीच स्थगित कराव्या लागतात. पाऊस तर दरवर्षी पडत असतोच, तो हानी करणार याचीही आपणास माहिती असते. मग आपण उपाययोजना का करत नाही? हानी टाळण्यासाठी उरलेल्या आठ महिन्यांत उपाययोजना का करत नाही? उत्तरे आपणास शोधावीच लागतील, अन्यथा हा निसर्गाचा प्रकोप, वरुण राजाचे तांडव यामुळे वसुंधरेवरील जीविताच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण होण्यास फारसा वेळ लागणार नाही.

# मराठवाड्यातले अतिवृष्टीग्रस्त मदतीच्या प्रतीक्षेत

मराठवाड्यातील नांदेड ,लातूर, बीड, परभणी या जिल्ह्यात गेल्या आठवड्यात अतिवृष्टी झाली. मराठवाड्यातील १३० मंडळात येणाऱ्या जवळपास २ हजार५५० गावांना या अतिवृष्टीचा फटका बसला. अतिवृष्टीमुळे पिकांची तर नासाडी झालीच आहे पण शहरी भागातही मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. या अतिवृष्टीची सरकार दरबारी नोंद आहे. पालकमंत्र्याकडून त्याची पाहणीही झाली आहे. परंतु अतिवृष्टीग्रस्त नागरिकांना मदतीसाठी अजून वाट पहावी लागत आहे.



मराठवाड्यातील नांदेड, लातूर, बीड, परभणी या जिल्ह्यांत मागच्या आठवड्यात अतिवृष्टी झाली. मराठवाड्यातील १३० मंडळांत येणाऱ्या जवळपास २५५० गावांना या अतिवृष्टीचा फटका बसला. वार्षिक सरासरी ६७९ मि.मी.च्या तुलनेत विभागात ५७३ मि. मी. म्हणजेच ८४% पाऊस झाल्याची नोंद आहे. मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे लाखो हेक्टरवरील पिकांची पूर्ण नासाडी झाली. एवढेच नव्हे तर शहरी भागात असलेल्या घरांमध्ये गुडघाभर पाणी शिरले. अतिवृष्टीमुळे मराठवाड्यात कोट्यवधींचे नुकसान झाले आहे. अतिवृष्टीग्रस्त नागरिक, शेतकरी व व्यापारी राज्य शासनाकडून मदतीच्या प्रतीक्षेत आहेत. मराठवाड्यात प्रशासनाकडून पंचनामे सुरू झाले आहेत. पालकमंत्र्यांकडूनही पूरग्रस्त भागाची पाहणी झालेली आहे. शासनाने लवकरात लवकर अतिवृष्टीग्रस्तांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी होत आहे.मराठवाड्यात मुसळधार पावसाचा कहर कायम असून नांदेड जिल्ह्यात गुरुवारी एकाच दिवशी तब्बल १३२.७ मिलिमीटर पाऊस झाला. याच जिल्ह्यातील ७३ महसूल मंडळात अतिवृष्टी झाली. मागील आठवड्यात चार दिवस मराठवाड्याला पावसाने झोडपले. विभागात शुक्रवारी सकाळी साडेआठपर्यंत ६० मिलिमीटर पाऊस झाला. नांदेड आणि लातूर जिल्ह्यात पावसाची तीव्रता अधिक होती. नांदेड जिल्ह्यात एका दिवसात १३२.७ मिमी पाऊस झाला तर लातूरला ९१.८, छत्रपती संभाजीनगर २९.९, जालना १३.१, बीड ४८.४, धाराशिव १६.१, परभणी ३८.४ आणि नांदेड जिल्ह्यात गुरुवारी तब्बल १३२.७ मिलिमीटर पाऊस झाला. हिंगोलीत १९.९ असा जिल्हानिहाय पाऊस झाला. पावसामुळे नदी-नाले दुथडी भरून वाहत आहेत. नांदेड आणि लातूर जिल्ह्यात अनेक पुलावरून पाणी वाहत असल्यामुळे वाहतूक ठप्प झाली होती. आजही बंधारे, तलाव पूर्ण भरून ओसंडून वाहत आहेत. या दोन जिल्ह्यांत पावसामुळे खरीप पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. विभागात १३० महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली आहे. त्यात नांदेड जिल्ह्यातील ७३ मंडळांचा समावेश आहे. कंधार आणि माळाकोळी महसूल मंडळात २८४ मिमी पाऊस झाला. विष्णुपुरी (२६७), कुरुळा (२२९), बारूळ, जायकवाडी धरणे भरली. जोरदार पावसामुळे मोठ्या धरणात पाण्याची आवक वाढली. जायकवाडी, सिद्धेश्वर, मानार आणि सिना कोळेगाव ही धरणे पूर्ण भरली आहेत. निम्न दुधना ७५, येलदरी ९६.३१, माजलगाव ८२.७९, मांजरा ९९.२०, पैनगंगा ९६.१५, निम्न तेरणा ९६.९२, विष्णुपुरी ५८.५५ असा धरणनिहाय पाणीसाठा आहे. विभागातील मोठ्या ११ धरणात ९३.७२ टक्के पाणीसाठा झाला आहे, अशी माहिती जलसंपदा विभागाने दिली. पेठवडज (२७५), डिग्रस (२२९) आणि कापसी (२६७) या मंडळात विक्रमी पाऊस झाला. मागील आठवड्यात संपूर्ण मराठवाड्यात पावसामुळे जनजीवन ठप्प झाले होते. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील चार मंडळे, बीड जिल्ह्यातील १६ आणि लातूर जिल्ह्यातील ३६ मंडळांत अतिवृष्टी झाली. लाखो हेक्टरवरील पिके खरडून गेली आहेत. शेतकऱ्यांच्या हातात काहीही पडणार नाही, हे सिद्ध झाले आहे.मराठवाड्यात पुन्हा ढगफुटीसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने लष्कराच्या तुकडीला मदतीला बोलवावे लागले. पावसाने अक्षरशः रौद्ररूप धारण केले होते. हा पाऊस ढगफुटीलाही लाजवेल एवढा मोठा होता. या पावसाबरोबरच नांदेड व लातूर जिल्ह्यात तेलंगणा, कर्नाटक सीमेवर असलेल्या गावांना बॅकवॉटरचा फटका बसला. एका रात्रीतून होत्याचे नव्हते झाले. अनेकांच्या घरात, दुकानात, शेतात, कारखान्यात मोठ्या प्रमाणात पाणी शिरले. या पाण्याचा अंदाज लावणे देखील कठीण होऊन बसले आहे. सलग साडेतीन ते चार तास ढगफुटीसदृश पावसाचा जोर कायम होता. हा पाऊस व चमकणाऱ्या विजा मनात धडकी भरवणाऱ्या होत्या. या पावसामुळे अपरिमीत हानी झाली. लातूर व नांदेडमधील हजारो नागरिकांच्या घरात गुडघाभर पाणी साचले होते.या पाण्याला बाहेर काढण्यासाठी अनेकांना दुपारपर्यंत झटावे लागले. मराठवाड्यात यंदाच्या अतिवृष्टीत नुकसानीचा अंदाज लावणे देखील कठीण होऊन बसले. नांदेड जिल्ह्यातील बिलोली, नरसी, नायगाव, मुखेड, कंधार, देगलूर, उमरी, मुदखेड, धर्माबाद, माहूर, किनवट, भोकर, अर्धापूर तालुक्यात मुसळधार पाऊस पडला. बिलोली तालुक्यात बॅकवॉटरचा मोठा फटका बसला. आकाशातून बरसणाऱ्या धारा व बॅकवॉटरच्या पाण्यामुळे महाराष्ट्र व तेलंगणा या दोन राज्यांचा संपर्क तुटला होता. या दोन राज्यांना जोडणाऱ्या सालूरा-बिलोली मार्गावर मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्याने तेथील पुलावरील वाहतूक थांबविण्यात आली होती. दक्षिणेकडील निजामाबाद, हैदराबाद, बोधन, कामारेड्डी या भागात मुसळधार पाऊस झाला. तेलंगणा, कर्नाटक या राज्यात दोन दिवस मोठा पाऊस झाला. हा पावसाचा जोर या दोन्ही राज्यांच्या सीमेवर असलेल्या लातूर व नांदेड जिल्ह्यातही वाढला. त्यामुळे या भागातील जनजीवन विस्कळीत झाले. गावातील नदीकाठच्या गावात मोठ्या प्रमाणात पाणी शिरले. त्यामुळे तेथील लोकांना सुरक्षित जागी स्थलांतरित करण्यात आले. नांदेड, हिंगोली व परभणीतही मोठा पाऊस झाल्याने या मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. हैदराबाद विभागातील भिकनूर-तळमडला सेक्शन, अक्कमपेठ-मेदक सेक्शन या मार्गांवर मुसळधार पावसामुळे काही ठिकाणी पाणी साचल्याने सर्वच रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या होत्या. दक्षिण मध्य रेल्वे अंतर्गत काही रेल्वे पटरीवरून पाणी वाहू लागल्याने वाहतुकीस रेल्वे विभागाने मनाई दर्शवली. त्याबरोबरच धर्माबाद-निझामाबाद-कामारेड्डी या रेल्वे स्थानकाच्या पटरीखालून गिट्टी वाहून गेल्याने रेल्वेसेवा पूर्णपणे विस्कळीत झाली. अनेक रेल्वेंचे मार्ग वळविण्यात आले. मुंबईहून सिकंदराबादला जाणारी देवगिरी एक्स्प्रेस निजामाबादपासून वळविण्यात आली होती. तेलंगणात जाणाऱ्या काही गाड्या अंशिक रद्द करण्यात आल्या होत्या.मागच्या आठवड्यात मराठवाड्यातील अनेक मंडळात अतिवृष्टी व मुसळधार पाऊस झाला. मराठवाड्यातील ६ लाख ६२ हजार हेक्टवरील शेत पिकांचे मोठे नुकसान झाले. मागील पंधरा दिवसांत झालेल्या नुकसानीचे पंचनामे शिल्लक असतानाच मराठवाड्यातील लातूर व नांदेड जिल्ह्यात पुन्हा एकदा आभाळ फाटले. मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्याचे या पूर्वीच सर्वाधिक नुकसान झाले. जवळपास ३ लाख हेक्टवरील पिके बाधीत झाल्याची शासन दफ्तरी नोंद आहे. मराठवाडा विभागात यंदा पावसाळ्यात आतापर्यंत ४१ व्यक्तींचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. त्यामधील सर्वाधिक १५ जणांचा समावेश नांदेडचाच आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात यंदाच्या पावसाळ्यात ११ जणांचा मृत्यू झाला. मराठवाडा विभागात आतापर्यंत यंदाच्या पावसाळ्यात ९२७ जनावरे दगावली असल्याची नोंद आहे.मराठवाड्यात या पावसाळ्यात १ हजार ८८७ घरांची पडझड झाल्याची नोंद आहे. अद्याप शेतकऱ्यांना संपूर्ण मदत पोहोचलेली नसतानाच निसर्गाने रौद्ररूप धारण करून मराठवाड्यात पुन्हा जलसंकट निर्माण केले. हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी, औंढा नागनाथ, सेनगाव व वसमत तालुक्यात मुसळधार पाऊस झाला. कयाधू नदीच्या पुरात एक अठरा वर्षीय तरुण वाहून गेल्याने चिंता व्यक्त करण्यात आली. शेख अरबाज शेख फिरोज असे त्या तरुणाचे नाव आहे. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड, पालम व पूर्णा तालुका संपूर्ण जलमय झाला होता. येलदरी व निम्न दुधना प्रकल्पाचे दरवाजे उघडून पाण्याचा विसर्ग करावा लागला. परभणी जिल्ह्यात नदीनाल्यांना पूर आल्यानंतर संपूर्ण शेत शिवार पाण्याखाली गेले होते. बीड जिल्ह्यातही पावसाने हाहाकार उडाला. त्या ठिकाणी १४ महसूल मंडळात अतिवृष्टी झाल्याची नोंद आहे, तर दीड लाख हेक्टर खरीप पिके पाण्याखाली गेल्याची शासन दरबारी नोंद आहे.

# येणाऱ्या काळात मोबाईल व्यसनमुक्ती केंद्र उभारावे लागतील

साधारणपणे व्यसन याला म्हणता येईल की,एखाद्या पदार्थाची किंवा वर्तनाची तीव्र इच्छा होणे.सर्वसाधारण भाषेत त्याला लत म्हणता येईल.एखादी गोष्ट वारंवार करण्याचे मन होणे व त्याच्या व्यक्ती अधीन होऊन जाणे.या सर्व प्रक्रिया व्यसनाच्या सदरात मोडतात.मानवी मनाला मेंदूने दिलेल्या आज्ञानुसार मनुष्य आपले कर्मेंद्रिय शारीरिक कामाला लावतात.त्यामध्ये प्रथम डोळे त्यांनतर मन एखाद्या विषयाकडे धाव घेतं व हात पाय त्या विषयाकडे वळतात. मात्र सर्वप्रथम या सवयीस कारणीभूत मन असते.मनाचा संयम उत्तम संयमपरंतु प्रथम बाह्य गोष्टीचा आघात होतो तो मनावरच...!अन एकदा का या मनावरील स्वतःचा ताबा सुटला तर ते अनेक गोष्टीच्या अधीन होऊन जाते. मग त्यातून व्यसन जडायला सुरुवात होते.व्यसनाचे अनेक प्रकार आहेत.त्यामध्ये मद्यप्राशन,धूम्रपान,सतत खरेदी करणे हे सुद्धा म्हणता येईल.हे व्यसन जडण्याचे अनेक कारणे आपणास दिसून येतात. त्यापैकी प्रथम म्हणजे नैराश्य.या नैराश्यातून व्यक्तीला आपले मन कुठेतरी गुंतून ठेवायचे असते. म्हणून त्यासाठी तो व्यक्ती व्यसन किंवा धूम्रपानाच्या आहारी जातो.दुसरे म्हणजे अपयश. या अपयशाला खचून काही व्यसनाच्या आहारी जातात.तिसरे असे की प्रेमभंग. प्रेमभंगातून मुले-मुले व्यसनाकडे वळायला लागलेले आपल्याला दिसून येते. त्याचप्रमाणे चौथे कारण म्हणजे उत्सव सण,साजरे करणे. जसे कि थर्टी फर्स्ट,मित्रांचे वाढदिवस आनंद म्हणून तरुण मंडळी सुरुवातीला धूम्रपान मध्यपान प्राशन करून बघतात व हळूहळू व्यसनाधीन होतात अशा प्रकारातून व्यक्ती व्यसनाधीन होतो.

आनंदा पोटी किंवा दुःख पोटी केलेले हे धूम्रपान व मद्यप्राशन एक दिवस व्यसनात रूपांतरित होते.व त्यातून व्यक्ति पूर्ण व्यसनाधीन झाल्यावर मात्र त्याला तेच सेवन किंवा प्राशन वारंवार करावेसे वाटते. यातूनच त्याचे शारीरिक व आर्थिक नुकसान होते. सामाजिक दृष्टिकोनातून त्याची पत खराब होते व स्वतःबरोबर कुटुंबासाठीही तो त्रासदायक ठरतो.यातून कित्येक कुटुंब,घर उध्वस्त झालेली आपण बघतो. एक विशिष्ट वयात साधारण कुमार वयातील मुले-मुलीं व्यसनाधीन होतात. तर काही वीस-पंच विशीतील व्यसनाच्या आहारी जातात. या व्यसनाधीन लोकांसाठी त्यांच्यात सुधारणा व्हावी म्हणून, समस्त जगभर समुपदेशन केंद्र उभारले आहेत.सल्लागार केंद्रे, आध्यात्मिक केंद्रे,संस्कार शिबिरे, व्यसनमुक्ती केंद्र सेवाभावी संस्था यासाठी प्रयत्न करत आहे.केंद्रात दाखल झालेली व्यक्ती समुपदेशनाद्वारे



किंवा काही मनावर ताबा ठेवून, स्वतःमध्ये बदल करून स्वतःला सावरून सुधारतात व त्याची व्यसनातून सुटका होते.

उपरोक्त व्यसनमुक्ती केंद्रातून व्यसनाधीन व्यक्ती सुधारून स्वतःचा विकास करून घेऊ शकतो.मात्र हल्ली सर्व जगभर घराघरात जे प्रत्येकाला व्यसन जडले आहे ते म्हणजे मोबाईलचे व्यसन.बाकी इतर व्यसन अंगी जडायला तरी एक विशिष्ट वय असते. मात्र हे मोबाईलचं व्यसन अगदी विचित्र आहे कि,ज्याला वय,काळ नाही. अगदी लहान वयातील मुलं म्हणजे एक वर्षाच ते दीड वर्षाचे मूल मोबाईलच्या आहारी गेलेलं आपल्याला दिसून येतं.व्हिडिओ बघितल्याशिवाय ते जेवण सुद्धा करत नाही.इतर व्यसनाला व्यक्ती स्वतः कारणीभूत असतो मात्र दीड ते दोन वर्षाच्या मुलांना मोबाईलचे व्यसन लावायला त्यांचीच आई-बाबा कारणीभूत असतात. म्हणजे या व्यसनाला वय नाही व लहान मुलांना मोबाईलच्या व्यसनाधीन बनवायला आई-बाबा जबाबदार आहेत.मुले जसे-जसे मोठे होऊ लागतात तसतसे त्यातील गेम, रिल्स बघायला लागल्यानंतर तर ते पूर्ण मोबाईल चे अधीनझालेले दिसून येतात. बाहेर खेळायला सुद्धा जात नाही मैदानी खेळ खेळत नाही. घरात बसून लठ्ठपणा व मनोरुग्न होताना दिसून येत आहे. त्यामुळे मुलं हट्टी होत आहे. एवढेच काय ! बारा ते चौदा वर्षाची मुलं मोबाईल हाताळायाला दिला नाही म्हणून, आत्महत्या करताना दिसून येत आहे. एवढी भयावह परिस्थिती हल्ली या मोबाईलच्या व्यसनामुळे झालेली आपल्याला दिसून येत आहे.

वयाच्या सोळा ते पंचवीस वयोगटातील तरुण-तरुणी सुद्धा मोबाईलच्या खूपच अधीन झालेल्या दिसून येत आहे.वेगवेगळ्या अँप्सच्या माध्यमातून रील बनवत आहे.अश्लील स्वरूपाच्या रिल्स बनवून समाजामध्ये अश्लीलता पसरवण्याचे काम करत आहे. एका विशिष्ट वयातील मुले आकर्षणापोटी, उत्सुकतेपोटी तासंतास ते बघत बसतात. अभ्यासाकडे दुर्लक्ष करतात. मैदानी खेळ खेळताना दिसत नाही. चार भिंतीच्या आतील व्हिडिओ गम खेळत आहेत. त्याचबरोबर व्हाट्सअप सारख्या ऍप्सवर हल्ली स्टेटस ठेवण्याचा कल(ट्रेंड)भरपूर प्रमाणात वाढला आहे.बाहेर कुठेतरी फिरायला गेले असता,स्वतःचे छायाचित्र कॅमेरात कैद करून स्टेटस ठेवतात.या सेल्फी काढण्याच्या नादात कितीतरी तरुण-तरुणींना जीव गमावा लागला आहे. काहींना व्यसन जडल जडलेले आपल्याला दिसून येत आहे.कुटुंबातील किंवा स्वतःचा वाढदिवस असल्यास त्याला ज्यांनी स्टेटसच्या माध्यमातून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या त्या स्टेटसचा स्क्रीनशॉट काढून स्वतःच्या स्टेटस ठेवण्याचा हल्ली ट्रेंड आहे.नेमकं यातून त्याला काय सिद्ध करायचे आहे कुणास ठाऊक?असो!

या स्वरूपाचे असे मोबाईल मध्ये असे अनेक प्स आहेत. त्यामध्ये फेसबुक,स्नॅपचॅट,इंस्टाग्राम,व्हिडिओ एडिटर यावर तरुण-तरुणी कितीतरी तास आयुष्यातील वेळ खर्च घालतात. अर्थात एखाद्या मद्यपीप्रमाणे त्या मोबाईल मध्ये तासान तास गुंतून गेलेले दिसून येतात. म्हणजेच त्यांना तीच क्रिया किंवा मोबाईल मधील तेच दृश्य,व्हिडिओ,छायाचित्र वारंवार बघावेसे वाटतात. म्हणजेच ते पूर्णतः मोबाईलचे अधीन झालेले आपल्याला दिसून येतात.तज्ज्ञांच्या मतानुसार मोबाईलच्या आहारी गेलेल्या अगदी चिमुकल्या पासून ची संख्या झपाट्याने वाढत आहे. सर्वेनुसार शंभरपैकी चाळीस ते पंचेचाळीस टक्के मुले पूर्णतःमोबाईलच्या आधीन झालेले आपल्याला दिसून येत आहे.तर तरुण-तरुणींचे मोबाईल मुळे मनोरुग्णांतील प्रमाण दुपटीने वाढले आहे.मोबाईलच्या सततच्या वापरामुळे डोळ्यांचा त्रास,मोबाईल झूकून बघितल्या मुळे मानेचा त्रास तर सततच्या एका जागी बसल्यामुळे कमरेचा त्रास होताना दिसून येत आहे. त्याचबरोबर कुटुंबातील नात्यांमध्ये गैरसमजातून मनभेद आणि मतभेद होताना दिसून येत आहे.

सध्याच्या काळात या पिढीला जडलेले हे मोबाईलचे व्यसन इतर व्यसनांपेक्षाही महाभयंकर ठरणारे आहे.इतर व्यसन तरी त्यांच्या नशेची तीव्रता कायम राहेपर्यंत राहील व काही काळाने उतरून जाईल.मात्र मोबाईलचे व्यसन याहून भिन्न आहे कारण त्यातील गेम्स,अश्लील व्हिडिओ,चित्र-विचित्र रील्स ह्या मुलांना व तरुणांनाच काय वृद्धांनासुद्धा आकर्षित करत आहे. दुसरी गोष्ट अशी कि,मोबाईल अर्थात भ्रमनध्वनी हा सोबत घेऊन कुठेही भ्रमन करू शकतो.त्यामुळे तो सतत व्यक्तींसोबत असतो. त्यातील इंटरनेटची सुविधा सर्वत्र उपलब्ध असल्यामुळे व्यक्ती रात्री-अपरात्री बघत बसतो.पूर्वी जे व्यावसायिक कॅमेऱ्यात मेगा फिक्सल यायचे ते हल्ली मोबाईलच्या कॅमेरा मध्ये दिसून येत आहे.तरुण तरुणीच काय वृद्धसुद्धा हल्ली कॅमेरातील फिल्टर्स मोडमुळे काळ्यासावळ्या चेहऱ्यावरील डागही त्यातील फिल्टर्स,क्रॉप,एडिटिंगचा वापर करून क्षणात मिटवून स्वतःला सुंदर दाखवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहे.त्यांचे मोबाईलच्या स्टेटसवरील सुंदर,आकर्षक एडिटेड फोटो बघितल्यावर प्रसन्न झालेल्या मनाचा त्यांना प्रत्यक्षात बघितल्यावर मात्र पूर्णतःभ्रमनिराश होतो.या अर्थहीन फालतू गोष्टींच्या नादात तरुण-तरुणी तासनतास घालवत आहे.जरी आपले कर्म सुंदर नसले तरी,जगासमोर सुंदर दाखवण्यासाठी प्रयत्न करीत आहे. असल्या या अर्थहीन गोष्टीमध्येच ही तरुण पिढी या मोबाईलच्या व्यसनाने आयुष्याची वाट लावून घेत आहे. या काळात सर्व जगाला या मोबाईलने भुरळ घातली आहे. त्याच्यापायी कित्येकांना आपले जीवन गमवावे लागले आहे.कित्येकजण एकलकोंडे होऊन मनोरुग्ण होतांना दिसून येत आहे. ज्याप्रमाणे दारू, सिगारेट,बिडी या व्यसनाने ग्रासलेल्यांना त्याच्यातून सुटका करून घेण्यासाठी किंवा जाचातून बाहेर काढण्यासाठी जसे व्यसनमुक्ती केंद्र, सल्लागार केंद्र,समुपदेशन केंद्र उभारले आहेत. त्याचप्रमाणे येणाऱ्या काळातमोबाईल व्यसनमुक्ती केंद्रउभारावे लागणार आहे असे वाटते.

**-श्री विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि बुलडाणा**

# कानेश्वर विद्यालयाचे शिक्षक नरहरी काकडे हे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानीत

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील साबला या गावचे रहिवासी असलेले तसेच कानेश्वर विद्यालय , कानडीमाळी . येथे क्रीडासहशिक्षक म्हणून कार्यरत असलेले श्रीमान नरहरी शहाजी काकडे यांना श्रीमान वैभव जगदेवी विवेक स्वामी , संपादक , समर्थ राजयोग , यांच्या नियोजनाने आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार-२०२५ देऊन सन्मानित करण्यात आले आहे .

या कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ समाजसेवक नितिन कोटेचा , तसेच प्रमुख पाहुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान , माजी आमदार उषाताई दराडे , जेष्ठ नेत्या सुशीलाताई मोराळे , महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे , दैनिक लोकप्रभा संपादक तथा , महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ जिल्हाध्यक्ष संतोषराव मानुरकर , सारडा सेठ , धुत सेठ इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाची सुरुवात आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर , क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीराव फुले , भारताचे दुसरे राष्ट्रपती भारतरत्न डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन व दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली . तसेच श्रीमान नरहरी शहाजी काकडे यांचे कानेश्वर विद्यालय , कानडीमाळी .तसेच त्यांच्या साबला या मुळ गावी त्यांनी केलेल्या योगदानाबद्दल . म्हणजेच स्वच्छता मोहीम , वृक्षारोपण मोहीम आणि सामाजिक कार्यात सहभाग ,आरोग्य शिबीर , व्याख्यान कार्यक्रमांच्या आयोजनात सहभाग , साक्षरता कार्यक्रम , ग्रामस्वच्छता अभियान मध्ये उत्कृष्ट कार्य , सामाजिक , सांस्कृतिक , क्रीडा , माध्यम क्षेत्रात उल्लेखनीय कार्य इत्यादी बाबींचा विचार करून श्रीमान नरहरी शहाजी काकडे यांना श्रीमान वैभव जगदेवी विवेक स्वामी , संपादक , समर्थ राजयोग यांच्या वतीने आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार-२०२५ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले .या वेळी श्रीमान समीर काझी , संपादक बीड प्रहार , ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ , पोपट काकडे , माजी ग्रामपंचायत सदस्य रामराजे शिंदे , अंकुशराव मुळे , राहुल सरवदे तसेच गणेश कटारे , महादेव काकडे , लखन राऊत , सुदर्शन काकडे , आकाश काकडे , वसंत नाईकनवरे , दादा परळकर , अनिल भोसले , हनुमंत परळकर , शिवाजी नाईकनवरे ,भरतराव काकडे , तानाजी आंडिल,संजय सरवदे या पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या वेळी साबला नगरीतील सर्व मित्र परिवार उपस्थितीत होता



## सातपुड्यात नवीन फळे-भाज्या सेवनास होणार सुरुवात

# बारामेघ : मोलगीत हजारो आदिवासी बांधवांच्या साक्षीने गावदेवती पूजन

**मोलगी । रविंद्र वळवी**

सातपुड्यातील निसर्गपूजक आदिवासी कालाकुणबी हा बारामेघ (वरुणराजा) ची कृतज्ञता म्हणून निलीचाराय, वाघदेव, गावदेवती हे सण साजरा होईपर्यंत शेतातील नवीन फळे व भाज्यांचे सेवन करणे टाळले जाते. परंपरेनुसार मोलगीत हा गावदेवती उत्सव हजारो सातपुडावासियांच्या साक्षीने साजरा झाला असून आजपासून प्रत्येक कालाकुणबी (शेतकरी) नवीन फळे व भाज्यांच्या सेवनास सुरुवात करणार आहे.



गावदेवती हा सातपुड्यातील उत्सवांपैकी एक असून याला प्राचीन इतिहास आहे. असा हा दैवी उत्सव यंदाही मोलगीत साजरा झाला. खरं तर हा उत्सव बारामेघ (वरुणराजा), वाघदेव यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी साजरा करण्यात आला. उत्सवाला शासकीय विश्रामगृह आवारातील जुन्या गावदेवाच्या ठिकाणाहून सुरुवात झाली. तेथे पुंजारा दमण्या वळवी यांच्या हस्ते पूजा करण्यात आली. उत्सवानिमित्त परिसरातून २० ढोलवादक व मालक आपापले ढोल घेऊन दाखल झाले होते. आदिवासी संस्कृतीचे प्रतीक असल्याने प्रथम हे वाद्य वाजवून उत्सवाला खरी सुरुवात झाली, तेथून ढोल वाजवत गावदेवती पूजनस्थळापर्यंत शाही मिरवणूक काढण्यात आली.

या पवित्र उत्सवासाठी १२ पाड्याच्या मोलगी गावातील ४० ज्येष्ठ व्यक्तींनी ९ दिवसांपूर्वी दुधाने आंघोळ करून पालनीस (व्रत पालन) सुरुवात केली. त्यात माजी पोलीस पाटील रतनसिंग वसावे यांच्यासह अन्य गावप्रमुखाचा समावेश होता. या उत्सवासाठी पुंजारा नुरजी बाबा वसावे, माजी जि.प.सदस्य सी.के.पाडवी, प्रदीप वसावे, रामसिंग वसावे, बिज्या वसावे, धिरसिंग वसावे, विजय वसावे, मधुकर वसावे, रुपसिंग वसावे, करमसिंग पाडवी, काँग्रेस पदाधिकारी प्रमोद वसावे, पारता वसावे, बाप पार्टीचे वाड्या वळवी, गिंब्या वळवी, रामसिंग वसावे, चंद्रसिंग वसावे, रोता वळवी, विनय वसावे, कागड्या वसावे, ड सरदारसिंग वसावे, तडवी रामा गुरुजी, पत्रकार आपसिंग वसावे, धिरसिंग वसावे, खेतमल वसावे, यांच्यासह अन्य ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

उत्सवासाठी सागर वसावे, तुकाराम वसावे, रमेश वसावे, बाज्या वसावे, काल्या वसावे, दामा वसावे, जेकमसिंग वसावे, तानाजी वसावे यांच्यासह सर्व गावबांधवांनी परिश्रम घेतले.

## माहेश्वर गणेश मंडळाच्या वतीने अकरा दिवस सामाजिक उपक्रम राबवून श्री गणेशाला निरोप



**हनुमंत चंदनकर नायगांव**

नांदेडच्या नायगाव तालुक्यातील नरसी येथील साईनगर वडगावे कॉम्प्लेक्स येथे स्थापन झालेल्या माहेश्वर गणेश मंडळाच्या वतीने आज दिनांक ६ सप्टेंबर रोजी मंडळाचे अध्यक्ष दिलीप वडगावे सर भागवताचार्य ह भ प डॉ श्री दिगंबर महाराज गडगेकर अनिल कांबळे ग्रामपंचायत सदस्य राजेश वडगावे दिनिल वडगावे गोविंद खनपट्टे, कपिल गिरी सर सुनील वडगावे अरविंद वडगावे महेश कांबळे आदी मंडळाच्या सदस्य कार्यकर्त्यांनी गेली ११ दिवस गणरायाची आरती पूजा व विविध सांस्कृतिक धार्मिक कार्यक्रमा व उपक्रम राबवून आज श्री गणरायाला गावभर ढोल ताशाच्या गजरात वाजत गाजत निरोप दिला गेल्या अनेक वर्षापासून जी अखंड परंपरा जपत मंडळाने गणरायाची स्थापना केली होती.

## खा.रवींद्र पाटील चव्हाण यांच्याकडून पूजा आरती करून गणरायाला निरोप





**हानुमंत चंदनकर**

५० वर्षाची अखंड परंपरा ..

नांदेडच्या नायगांव शहरातील प्रसिद्ध मानाच्या गणपतीची पूजा आरती नांदेड जिल्ह्याचे खासदार रवींद्र पाटील चव्हाण यांच्या वतीने पुजा आरती करण्यात आली ५० वर्षापासून अखंड परंपरा असलेला व नवसाला पावणारा गणपती म्हणून ओळख आहे पारंपारिक पद्धतीने मिरवणूक काढण्यात आली खासदारांनी गणपती पालखी खांद्यावर घेऊन मिरवणूकीमध्ये सहभागी झाले होते जोड गणपती बसवण्यात येतात व दोन गणपतीच्या मधोमध एक श्रीफळ ठेवलं जातं.शेवटी गणपती महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी त्या लिलाव लावण्यात येतो यंदाचा मानाचा नारळ श्री व्यंकटराव यांनी बोली लावत एकावन्न हाजर रुपयला त्यांनी घेतले गणपती पालखीत बसवून गावभर मिरवणूक काढण्यात आली जागोजागी गणपतीची भाविकांनी पुजा आरती केली मिरवणूकीत पारंपारिक भजनी मंडळ टाळ मृदंग वाजवत सहभागी झाले होते यावेळी खासदार रवींद्र पाटील चव्हाण, नगरउपाध्यक्ष विजय पाटील चव्हाण, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष श्री हनमंत पाटील चव्हाण, यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कॉलेज ट्रस्टच्या अध्यक्षपदी माळी कायम नाशिक धर्मदाय सह आयुक्तांचा निकाल







**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा येथील अध्यापक शिक्षण मंडळातर्फे चालवल्या जाणाऱ्या कला व वाणिज्य महाविद्यालय ट्रस्टच्या अध्यक्षपदी भरत माळी यांची निवड वैध ठरवण्यात आली आहे. धर्मदाय सह आयुक्त-२, नाशिक यांनी निखिल तुरखिया यांनी दाखल केलेला हरकत अर्ज फेटाळून लावत हा निकाल दिला.

यापूर्वी सहाय्यक धर्मदाय आयुक्त, नंदुरबार यांनी भरत माळी यांच्यावतीने कोषाध्यक्ष लक्ष्मण माळी आणि उपाध्यक्ष रोहित माळी यांनी दाखल केलेला बदल अर्ज मंजूर केला होता. या निर्णयाला आव्हान देत निखिल तुरखिया यांनी धर्मदाय सह आयुक्त-२, नाशिक यांच्या न्यायालयात हरकत अर्ज दाखल केला होता.या प्रकरणावर सुनावणी होऊन, १ सप्टेंबर २०२५ रोजी नाशिकच्या धर्मदाय सह आयुक्तांनी तुरखिया यांचा अर्ज नामंजूर केला. आपल्या निकालात कोर्टाने स्पष्ट केले की, महाविद्यालय ट्रस्टचे कामकाज सुरळीत चालवण्यासाठी, बँकेतील व्यवहार करण्यासाठी आणि शासनासोबत पत्रव्यवहार करण्यासाठी अधिकृत कार्यकारी मंडळ असणे आवश्यक आहे. कनिष्ठ न्यायालयाने बदल अर्ज स्वीकारल्यामुळे संस्थेचे कोणतेही नुकसान झाले नाही. उलट, यामुळे कामकाजाची जबाबदारी निश्चित झाली. त्यामुळे सहाय्यक धर्मदाय आयुक्तांच्या आदेशात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता नसल्याचे कोर्टाने नमूद केले.या निकालानुसार, भरत बबनराव माळी हे कायदेशीररित्या अध्यक्ष असून, त्यांचे कार्यकारी मंडळ वैध असल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच, २१ जुलै २०२५ रोजी भरत माळी यांच्या अध्यक्षतेखाली झालेली सर्वसाधारण सभाही कायदेशीर ठरली आहे. भरत माळी यांच्या बाजूने धुळे येथील विधिज्ञ देवेंद्र शिरोडे यांनी कामकाज पाहिले.

# भारतीय बौद्ध महासभेच्या बीड महिला तालुकाध्यक्षपदी मंदाताई मस्के यांची निवड

## कॅप्टन राजाभाऊ आठवले यांची मेजर जनरल पदावर पदोन्नती बदल सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथे भारतीय बौद्ध महासभेची मासिक बैठक दि. ५ सप्टेंबर रोजी नुकतीच संपन्न झाली. या बैठकीत धम्म सेविका मंदाताई मस्के यांची बीड जिल्हा महिला तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली. या बैठकीचे अध्यक्षस्थान बीड जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष महालिंग निकाळजे यांनी भूषवले, पूज्य भंते बुद्धघोष, महिला अध्यक्ष अरुणाताई निसर्गन उपस्थित होत्या.

बैठकीचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र राज्याचे संरक्षण सचिव अमरसिंह ढाका आणि माजी विभागीय सचिव व्ही.एन. निसर्गन उपस्थित होते. उपस्थितांनी मंदाताई मस्के यांचा तालुकाध्यक्षपदावर निवड झालाबद्दल विशेष सत्कार केला.

याशिवाय, कॅप्टन राजाभाऊ आठवले यांची समता सेनिक दलाचे मेजर जनरल पदावर पदोन्नती झाली, त्याबद्दलही भारतीय बौद्ध महासभेच्या बीड जिल्हा शाखेने त्यांचा सत्कार केला. याप्रसंगी विविध पदाधिकारी उपस्थित होते, ज्यामध्ये जिल्हा सरचिटणीस सिद्धार्थ जगझाप बीड जिल्ह्यातील प्रचार व पर्यटन उपाध्यक्ष अँड. हनुमंत कांबळे, हिशोब तपासणीस सोनवणे साहेब, बीड तालुकाध्यक्ष राजेंद्र ससाने, संस्कार उपाध्यक्ष गौतम खेमाडे, गेवराई तालुका अध्यक्ष अनिल बोराडे, सचिव सुभाष बांगर, जिल्हा संघटक के.के. सरवदे,अनिल डोळस, दाभाडे राजेंद्र, सिद्धार्थ गरुड,गोपीनाथ बनसोडे, एस.एस.शिंदे, नामदेव वाघमारे आदी बीड शहरातील भारतीय बौद्ध महासभेचे आजी-माजी पदाधिकारी बौद्ध उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या बैठकीने बौद्ध महासभेच्या कार्याला नवीन दिशा दिली आहे आणि महिला नेतृत्वाच्या विकासात महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे



# केज महावितरणच्या कर्तव्यदक्ष अधिकारी शितल सय्यद

## इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे महावितरणच्या कर्मचाऱ्यांनाही सन्मान द्या-शितल सय्यद

## पुढाऱ्यांच्या दबावामुळे १५ वर्षांत तब्बल ९ वेळा बदली

**केज | प्रतिनिधी**

कर्तव्याशी प्रामाणिक राहून जबाबदारी पार पाडणारे अधिकारीच खऱ्या अर्थाने समाजाचा कणा ठरतात. मेहनती, प्रामाणिक आणि पारदर्शक कारभार करणाऱ्या अशा अधिकाऱ्यांना प्रोत्साहन देण्याऐवजी त्यांच्यावर राजकीय दबाव आणून वारंवार बदलीला सामोरे जावे लागत असल्याचे वास्तव आपल्या समोर आहे. याचाच अनुभव महावितरणच्या कर्तव्यदक्ष महिला अधिकारी शितल सय्यद यांना गेल्या १५ वर्षांत तब्बल ९ वेळा आला आहे.

३ जुलै २०२५ रोजी त्या केज महावितरणला रुजू झाल्या. रुजू होताच प्रलंबित कामांचा ढीग, विजचोरी, थकीत बिले, नागरिकांचा असंतोष अशी बिकट परिस्थिती त्यांच्या लक्षात आली. महावितरणची डळमळीत प्रतिमा सुधारण्याचा त्यांनी निर्धार केला आणि लगेचच वसुली मोहीम हाती घेतली. परिणामी जुलै महिन्यात तब्बल १०४ टक्के, तर ऑगस्ट महिन्यात १०८ टक्के वसुली करून त्यांनी प्रशासनाला आश्चर्यचकित केले.


याचबरोबर विजचोरीला आळा घालण्यासाठी त्यांनी मोहीम राबवली. पावसाळा असो वा उन्हाळा – स्वतः कर्मचाऱ्यांसोबत रस्त्यावर उतरत डीपी दुरुस्तीची कामे, विजचोरी पकड मोहीम सुरू केली. नैतिकतेला धरून कार्य करण्याची त्यांची तळमळ पाहून सामान्य ग्राहक आनंदी झाले. मात्र, नेहमीप्रमाणे काही स्थानिक पुढाऱ्यांनी दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. असंविधानिक कामे करण्याचे आदेश देण्यात आले. मात्र सय्यद यांनी न डगमगता कर्तव्याशी तडजोड नाही या भूमिकेवर ठाम राहून कार्य सुरु ठेवले.आज केज महावितरणची डळमळीत प्रतिमा सुधारण्याचा प्रयत्न त्यांच्या नेतृत्वाखाली होत असून, महावितरणमधील अधिकारी-कर्मचाऱ्यांनाही इतर सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणेच सन्मान मिळायला हवा, अशी मागणी सय्यद यांनी केली आहे



## कात्री गावात बेरोजगारीवर मोठा उपाय-सरपंच संदीप वळवी यांच्या पुढाकारातून ग्रामरोजगार अभियान सुरु

**मोलगी | रविंद्र वळवी**

वाढती बेरोजगारी आणि गावातील तरुणांचे शहरांकडे होणारे स्थलांतर पाहता, कात्री ग्रामपंचायतीने आता रोजगारनिर्मितीचा निर्धार केला आहे. गावाचे सरपंच संदीप वळवी यांच्या नेतृत्वाखाली ग्रामरोजगार अभियान २०२५ सुरु करण्यात आले असुन विविध योजनांच्या माध्यमातून स्थायी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे.



रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी काही मुख्य योजना राबवुन ग्रामस्थांच्या पुढाकाराने कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र सुरु करुन तरुणांना इलेक्ट्रिशियन, प्लंबिंग, सिव्हिल वर्क, संगणक प्रशिक्षण, शिवणकाम आदीं प्रशिक्षणे सुरु करुन बेरोजगारांना प्रमाणित प्रशिक्षण दिलं जाणार आहे. तसेच महिला बचत गटांसाठी ही स्वतंत्र प्रशिक्षण कार्यक्रम राबवले जाणार आहेत. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत स्थानिक तरुण-तरुणींना स्वतःचा व्यवसाय सुरु करता यावा यासाठी शासनाच्या विविध योजनांची माहिती, मार्गदर्शन व कर्ज सहाय्य देण्यात येणार आहे. त्यासाठी बँक प्रतिनिधींच्या उपस्थितीत रोजगार मार्गदर्शन मेळावे घेण्यात येणार आहेत. ग्रामपंचायतीच्या पुढाकारामुळे गावातील अनेक युवक-युवतीं व शेतकऱ्यांनी या उपक्रमात सहभागी होण्याची तयारी दर्शवली आहे. काहींनी प्रशिक्षण घेण्यासाठी नोंदणीही केली आहे.गावात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत नवे प्रकल्पाची संकल्पना घेऊन शेततळे, रस्ते, वृक्षारोपण, जलसंधारण आदीं कामाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी निर्माण करुनन ग्रामस्थांना तात्पुरता रोजगार पुरवला जाणार आहे. तसेच स्थानिक संसाधनां द्वारे स्थानिक उद्योजकांशी भागीदारी करुन

लघुउद्योग, अन्न प्रक्रिया यामध्ये स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन देऊन रोजगार वाढवण्यासाठी विशेष निधीची मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे सातपुड्याच्या खोऱ्यातील कात्री गाव हे रोजगाराच्या निर्मितीच्या माध्यमातून स्वयंपुर्णत्वाकडे वाटचाल करत आह

## तळोदा तालुक्यात पावसामुळे पूर;जनजीवन विस्कळीत



**नंदुरबार | दिपक गोसावी**

गेल्या पाच-सहा दिवसांपासून तळोदा तालुक्यात सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. तालुक्यातील नद्या-नाल्यांना मोठा पूर आला असून, रविवारी सकाळी शहरातील खर्डी नदीला तब्बल सतरा वर्षांनंतर पूर आल्याने नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे शेतीची कामे थांबली आहेत. त्यातच शनिवारपासून पावसाचा जोर वाढल्याने नदीकाठच्या शेतात पाणी शिरून पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. चौगाव आणि रेवानगर येथील नाल्यांना आलेल्या पुरामुळे शेतीत पाणी साचले आहे. शेतकरी आता पावसाने उघडीप देण्याची वाट पाहत आहेत.

सातपुडा पर्वतात झालेल्या अतिवृष्टीमुळे आमलाड, धानोरा, आणि दसवड येथील नाल्यांना पूर आला. यामुळे रस्त्यांवरून पाणी वाहत असल्याने वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. पाडवी हाटी जवळ पुलावरून पाणी वाहत असल्यामुळे नागरिकांनी पूर पाहण्यासाठी गर्दी केली होती.

## पत्रकार चंद्रकांत पाटील यांचा शिवसेनेच्या वतीने केला सत्कार

**केज | प्रतिनिधी**

समर्थ राजयोगच्या वर्धापन दिनानिमित्त पत्रकार चंद्रकांत पाटील यांचा आचार्य बाळशास्त्री जांभेकर उत्कृष्ट तालुका प्रतिनिधी म्हणून निवड झाली.या यशाबद्दल शिवसेना कार्यालयात दि.६ सप्टेंबर रोजी शनिवारी आयोजित कार्यक्रमात त्यांचा सत्कार करण्यात आला सत्कार समारंभाला शिवसेना तालुकाप्रमुख पृथ्वीराज सुरेशराव पाटील,शिवसेना विधानसभा प्रमुख दादासाहेब शंकरराव ससाणे,युवासेना तालुकाप्रमुख दत्तकुमार काकडे,युवासेना उप तालुकाप्रमुख शिवाजी गायकवाड,विठ्ठल झाडे, विनोद महाजन,ज्ञानेश्वर पवार आदी मान्यवर उपस्थित होते.या प्रसंगी मान्यवरांनी चंद्रकांत पाटील यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की,ग्रामीण भागातील समस्या व जनतेचे प्रश्न समाजापुढे मांडण्याचे उल्लेखनीय



कार्य तेसातत्याने करीत आहेत.त्यांच्या या पत्रकारितेच्या योगदाना मुळेच त्यांना हा बहुमान मिळाला आहे.पत्रकार चंद्रकांत पाटील यांनीही यावेळी सर्व मान्यवरांचे आभार मानले.हा पुरस्कार माझ्या पत्रकारितेच्या कार्याची दखल घेत मिळालेला सन्मान असून यामुळे आणखी जबाबदारी वाढली आहे.समाज हितासाठी निष्पक्षपणे लेखणी चालवत राहीन असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दत्तकुमार काकडे यांनी केले तर आभारप्रदर्शन शिवाजी गायकवाड यांनी मान्यवरांचे मानले

## भक्ती,प्रेरणा आणि समाज प्रबोधनाचा अविस्मरणीय सोहळा-आमदार मंगेश चव्हाण

**चाळीसगाव | प्रतिनिधी**

चाळीसगाव येथे एकदंत गणेश महोत्सवानिमित्त आयोजित कीर्तन सोहळ्यात वारकरी संप्रदाय भूषण,प्रेममूर्ती, गुरुदास ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या कीर्तनाने भाविकांचे मन,बुद्धी आणि आत्मा भारावून गेला.उपस्थित प्रत्येक श्रोत्याच्या अंत:करणा ला भक्तिभावाची ओल आणिसमाजप्रबोधनाची नवी दिशा लाभली.या सोहळ्यास आमदार मंगेश रमेश चव्हाण यांनी आवर्जुन उपस्थित राहून भक्तिगंगा अनुभवली.संतपरंपरेचा दिव्य संगम ह.भ.प. समाधान महाराजांनी आपल्या प्रभावी शैलीत शिवमहापुराण,रामकथा तसेच संत परंपरेतील विचार यांचा अद्भुत संगम घडवला.त्यांच्या कीर्तनात केवळ धार्मिक गोष्टींचा वेध नव्हता,तर सामाजिक जाणीवेची ठिणगी पेटवणारे संदेश होते. युवकांना प्रगतीची प्रेरणा,शेतकऱ्यांच्या अडचणींवर उपाय




योजना,कुटुंबातील नातेसंबंधातील संस्कार, आणि एकूणच समाजाला बांधून ठेवणारे विचार असा सर्वसमावेशक दृष्टिकोन त्यांच्या वाणीमधून प्रकट झाला.समाजाशी घट्ट नाळ जोडणारे विचार कीर्तनऐकणाऱ्या श्रोत्यांना असे वाटत होते की,महाराजांनी त्यांच्या जीवनातील प्रश्न ओळखले आणि त्यांना योग्य दिशा दिली.त्यांचे कथन हे फक्त धर्म प्रबोधना पुरते मर्यादित नसून जीवनातील अंधार दूर करणारी एक प्रदीर्घ दीपज्योत होती. समाजाशी जोडलेली ही संतपरंपरेची वाणी आजच्या काळात फारच महत्त्वाची आहे, अशी भावना अनेक श्रोत्यांनी व्यक्त केली

# स्वायत्तता टीकली तरच लोकशाही ही टिकेल-न्या.उज्जल भुयान

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

राज्यघटना हे न्यायव्यवस्थेचे अधिष्ठान असून न्यायालय ही घटनात्मक संस्था आहे. या न्यायव्यवस्थेने आत्तापर्यंत लोकशाही मजबूत करणारे न्यायनिवाडे दिले आहेत. न्यायालयाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याची जबाबदारी न्यायाधीशांबरोबरच वकील व सत्ताधाऱ्यांची आहे. ही स्वायत्तता लोकशाही टिकवेल असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उज्जल भुयान यांनी केले.अहमदनगर सेंट्रल ॲडव्होकेट बार असोसिएशनच्या वतीने जिल्हा न्यायालय स्थापनेच्या द्विशताब्दी महोत्सवपूर्तीच्या व्याख्यानमालेत त्यांनी ‘कोर्टाच्या माध्यमातून लोकशाहीचे मजबुतीकरण’ या विषयावर आपले विचार मांडले. याप्रसंगी सौ. संघमित्रा भुयान, मुंबई उच्च न्यायालयातील जिल्ह्याचे पालक न्यायाधीश श्रीमती विभा कंकणवाडी, न्या. रोहित जोशी, प्रधान जिल्हा न्यायाधीश श्रीमती अंजू शेंडे, जिल्ह्यातील सर्व न्यायाधीश, जिल्हा पोलीस प्रमुख श्री. सोमनाथ घार्गे, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा सहकारी वकील एस. के. पाटील हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.न्यायप्रक्रिया गतिमान करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने कृती आराखडा राबविण्याचे निर्देश जिल्हा स्तरावर दिले असून पंधरा वर्षांहून अधिक प्रलंबित खटले प्राधान्याने निकाली काढण्यात येत आहेत. न्यायनिवाडा त्वरित मिळावा अशी अपेक्षा करणाऱ्यांना त्यांनी – ही काय वनडे किंवा वीस-बाय-वीस क्रिकेट मॅच नाही, खटल्यातील गुण-अवगुणांचा न्यायाधीशाना परामर्श घ्यावा लागतो – असे सुनावले. सर्वोच्च न्यायालय लोकशाही रक्षणासाठी मुक्त व स्वतंत्र न्यायव्यवस्था संविधानाच्या संरक्षकांची भूमिका पार पाडीत असून संसदेने राज्यघटनेच्या मर्यादा ओलांडण्याचा केलेला प्रयत्न सर्वोच्च न्यायालयाने लोकांच्या अधिकारांद्वारे वेळीच प्रतिबंध केला. हे त्यांनी विविध खटल्यांचा संदर्भ देऊन स्पष्ट केले. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी बजावलेल्या कठोर न्यायदानाचा त्यांनी गौरव केला ज्येष्ठ विधिज्ञांचा सत्कार करताना आपल्या वडिलांच्या वकिलीच्या सुवर्ण महोत्सवी सन्मानाचा प्रसंग सांगताना ते गहिवरून आले.या सोहळ्यात ७५ वर्षे ओलांडलेल्या ज्येष्ठ विधिज्ञ ॲड . एस. एच. काकणी, एस. बी. पलोड, अच्युतराव चौधरी, अशोक कोठारी, राधाकृष्ण पुलाटे, ए. के. गुगळे, विश्वासराव आठरे, पा. अच्युतराव पिंगळे, ए. एस. गांधी, आय. पी. काझी, जगदीश खंडेलवाल, अशोक झरकर व न्यायदानात प्राविण्य मिळवणारे मुंबईचे ॲड . प्रमोद [illegible], नितीन गवारे, किशोर पाटील आदींचा सन्मान करण्यात आला. न्यायमूर्ती रोहित जोशी यांनी – आत्मविश्वास, मनाची दृढता, कठोर परिश्रम, धैर्य व प्रयत्नातील सातत्यता – या पंचसूत्रांचे पालन केल्यास जीवनात यशस्वी होता येते, असे सांगितले.न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी यांनी राज्यघटनेविषयी संवेदनशील राहण्याची प्रेरणा अशा व्याख्यानमालांमधून मिळते, कायद्याचे पालन हे संस्कृतीचा अविभाज्य भाग असून त्यामुळे भारतीय संस्कृती महान होईल, असे सांगितले.जिल्हा प्रधान न्यायाधीश श्रीमती अंजू शेंडे यांनी – वकिलांतून न्यायाधीश घडतात. व्याख्यानमालेतील ज्ञानाची पर्वणी नव्या पिढीला संजीवनी देणारी आहे. कायद्यातील तरतुदींचा समाजातील शेवटच्या घटकापर्यंत लाभ झाला पाहिजे – असे सांगितले.सेंट्रल ॲडव्होकेट्स बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अशोक कोठारी यांनी स्वागतपर भाषणात जिल्हा न्यायदान प्रक्रियेतील ऐतिहासिक थोर उज्जल परंपरेचे योगदान अधोरेखित करून व्याख्यानमालेतून मिळणाऱ्या ज्ञानाचा अनुभव नव्या पिढीस प्रेरक ठरून ‘सर्वांसाठी न्याय’ या संकल्पनेप्रमाणे न्यायदान प्रक्रियेस गती मिळत असल्याचा विश्वास व्यक्त केला. श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेतील विद्यार्थ्यांच्या स्वागतगीताने व न्यायदीप प्रज्वलनाने सोहळ्याची शानदार सुरुवात झाली. असोसिएशनचे सचिव ॲड. योगेश काळे यांनी आभार मानले. प्रसाद बेडेकर यांनी सूत्रसंचालन केले. पसायदानाने सांगता झाली. जिल्ह्यातील विविध न्यायालयातील न्यायाधीश, वकील, कायदे अभ्यासक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077